03-03-2025-Dai-01new_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/03/2025 12:03 AM Page 1

मालपे बायपास राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी खुला पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

भारताचा न्यूझीलंडवर नेत्रदीपक विजय! पान ४ वर

वेर्णा, सोमवार, ३ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 179 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 3 March 2025 | Pages 4 | ₹ 4

खापरेश्वर मंदिर स्थानांतरित करण्यावर तणाव

फ्लायओव्हरच्या बांधकामासाठी अडथळा : उच्च न्यायालयाची परवानगी

■ टीम दैनिक हेराल्ड :

पर्वरी, दि. २ : पर्वरीत सुरू असलेल्या फ्लायओव्हरच्या बांधकामासाठी अडथळा ठरत असलेले २०० वर्षांहून अधिक जुने वडाचे झाड स्थानांतरित करण्यास उच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर रविवारी सकाळी सहा वाजता महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिस बंदोबस्तात ही प्रक्रिया सुरू केली. मात्र, काही वेळातच स्थानिकांचा विरोध तीव्र झाला आणि परिस्थिती तणावपूर्ण बनली.

झाडाच्या शेजारी असलेल्या खापरेश्वर मंदिराला धक्का लागू नये, या मागणीसाठी आंदोलक आक्रमक झाले. सामाजिक कार्यकर्ते स्वप्नेश शेर्लेकर यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी जोरदार वाद घालत मंदिराला हानी पोहोचल्यास परिणाम गंभीर होतील, असा इशारा दिला. पोलिसांनी त्यांना मंदिराच्या आवाराबाहेर हटवल्याने तणाव अधिक वाढला. त्यानंतर मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक आणि महिलांनी एकत्र येत मंदिराच्या स्थलांतरास विरोध दर्शविला. झाड हटवा, पण मंदिराला धक्का लागू नये, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली.

आंदोलनामुळे पर्वरी परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी झाली. खापरेश्वर मंदिराच्या ठिकाणी दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. रुग्णवाहिकांनाही कोंडीचा फटका बसला. आधीच फ्लायओव्हरच्या कामामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असताना, या आंदोलनामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली. पोलिस प्रशासनाने योग्य नियोजन न केल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला.

दरम्यान, ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी वादग्रस्त वडाच्या झाडाच्या वरच्या सर्व फांद्या छाटल्या. परिस्थिती काहीशी निवळल्यानंतर पोलिस मध्यस्थीने अधिकाऱ्यांसोबत मंदिर व्यवस्थापनाची बैठक झाली. चर्चेनंतर मंदिरावरील लोखंडी पत्र्याची शेड आणि मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळील घंटा हलवण्यात आली. त्यानंतर खापरेश्वराची विधिवत पूजा करून मूर्ती सुरक्षितपणे स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्थानिक नागरिक आणि भाविकांच्या मते, न्यायालयाच्या आदेशात मंदिर हटवण्याचा उल्लेख नव्हता. मात्र, वडाचे झाड स्थानांतरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खोदाई करावी लागणार असल्याने मंदिराच्या मूर्तीला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर भाविकांनी मंदिराची मूर्ती योग्य पद्धतीने दुसऱ्या ठिकाणी स्थापित करण्याची मागणी केली. अखेर चर्चेनंतर सहमती झाल्यामुळे संघर्षावर पडदा पडला.

गेल्या अनेक पिढ्यांसाठी श्रद्धास्थान असलेल्या या वडाच्या झाडाचे एकेक फांदी तुटताना पाहून काही नागरिक भावुक झाले. काही महिलांनी 'आमच्या खापरेश्वराला आमच्यापासून तोडू नका' असे हृदयद्रावक आवाहन केले. तणाव निवळला असला तरी खापरेश्वर मंदिराच्या नव्या उभारणीबाबत स्थानिक आणि राजकीय वर्तुळात चर्चा सुरूच राहणार असल्याचे दिसते.

सेबीच्या माजी अध्यक्षा माधवी बुच यांच्याविरोधात गुन्हा

मुंबई, दि. २ :

येथील विशेष न्यायालयाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला (एसीबी) शेअर बाजारातील फसवणूक आणि नियामक उल्लंघनाच्या आरोपांप्रकरणी भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड (सेबी)च्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि अन्य पाच अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

विशेष एसीबी न्यायालयाचे न्यायाधीश शशिकांत एकनाथराव बांगर यांनी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे की, नियामक त्रुटी आणि संगनमताचे प्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे. तसेच, न्यायालयाने स्पष्ट केले की, या आरोपांमध्ये दखलपात्र गुन्ह्यांचे स्पष्ट संकेत असून, सखोल तपास होणे आवश्यक आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार, सेबीच्या निष्क्रियतेमुळे आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या दुर्लक्षामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदींनुसार न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक ठरला आहे. न्यायालयाने निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये सेबीचे माजी पूर्णवेळ सदस्य अश्वनी भाटिया, अनंत नारायण जी, कमलेश चंद्र वार्ष्णेय तसेच बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदररामन रामामूर्ती आणि तत्कालीन अध्यक्ष व जनहित संचालक प्रमोद अग्रवाल यांचाही समावेश आहे. न्यायालयाने पुढील ३० दिवसांत चौकशीचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सदर तक्रार एका माध्यम प्रतिनिधीकडून दाखल करण्यात आली होती, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक, नियामक उल्लंघन आणि भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. या आरोपांमध्ये, सेबीच्या अधिकाऱ्यांनी नियामक निकषांचे उल्लंघन करून, संगनमताद्वारे, एका कंपन्याची फसवणुकीच्या माध्यमातून सूची नोंदणी केल्याचा समावेश आहे.

तक्रारदाराच्या मते, सेबीच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैधानिक जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यात अपयश दर्शवले आणि बाजारातील फेरफारास चालना दिली. तसेच, नियामक संस्थांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नाही, असे तक्रारदाराने न्यायालयास सांगितले. न्यायालयाने प्रकरणाचा सखोल अभ्यास करून, एसीबीच्या मुंबई विभागाला आयपीसी, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, सेबी कायदा आणि अन्य लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या वर्षी हिंडेनबर्ग रिसर्चने बुच यांच्यावर हितसंबंधांच्या संघर्षाचे आरोप लावत सेबीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यानंतर भारतातील पहिल्या महिला सेबी अध्यक्षांवर राजीनाम्याचा दबाव वाढला. हिंडेनबर्गच्या दाव्यानुसार, बुच आणि त्यांच्या पतींनी अशा ऑफशोअर कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली होती, ज्या अदानी समूहाच्या संस्थापकांच्या कुटुंबीयांशी संबंधित होत्या. मात्र, बुच यांनी हे आरोप फेटाळून लावत नियामक प्रक्रियेचे संपूर्ण पालन केले असल्याचे स्पष्ट केले.

निवडक

आकाश आनंद यांची सर्व पदांवरून हकालपट्टी

नवी दिल्ली, दि. २ : बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा मायावती यांनी त्यांचे पुतणे आकाश आनंद यांची पक्षाच्या समन्वयक (कोऑर्डिनेटर) पदावरून हकालपट्टी केली आहे. मायावती यांनी आकाश यांचं नाव त्यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून जाहीर केलं होतं. तसेच त्यांची पक्षाच्या राष्ट्रीय समन्वयक पदावरही आकाश आनंद यांची नेमणूक केली होती. मात्र, आता आकाश यांना त्यांच्या पदावरून हटवण्यात आलं आहे. मायावती यांनी राज्यसभा खासदार रामजी गौतम यांच्यावरील जबाबदारी वाढवली आहे. मायावती यांनी रामजी गौतम यांची पक्षाच्या राष्ट्रीय समन्वयक पदावर नेमणूक केली आहे. यापूर्वी मायावती यांनी आकाश आनंद यांचे सासरे अशोक सिद्धार्थ यांच्याकडील पक्षाच्या जबाबदाऱ्या काढून घेतल्या होत्या. बसपा प्रमुख मायावती यांनी आज पक्षाची एक महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत हे निर्णय जाहीर केले. दरम्यान, आता मायावती यांचा उत्तराधिकारी कोण असेल असा प्रश्न सर्वांना पडला आहे. मात्र, मायावती यांनी यावरही पक्षाच्या बैठकीत उत्तर दिलं. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत माझा कोणीही उत्तराधिकारी नसेल असं त्यांनी जाहीर केलं आहे.

उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टीमुळे ८ जणांचा मृत्यू

चमोली, दि. २ : उत्तराखंडमधील चमोली येथे २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या हिमस्खलनात अडकलेल्या आठ कामगारांचा मृत्यू झाला. यापैकी चार जणांचा बचावकार्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर रविवारी चार मृतदेह बाहेर काढण्यात आले. ४६ कामगारांना सुखरूप वाचवण्यात आले.

शुक्रवारी, अपघाताच्या दुसऱ्या दिवशी, १७ लोकांना बाहेर काढण्यात आले. शनिवारी ३३ लोकांना बाहेर काढण्यात आले. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला होता. आधी बेपत्ता कामगारांची संख्या ५५ असल्याचे सांगण्यात आले होते, परंतु शनिवारी असे कळले की एक कामगार कोणालाही न कळवता छावणीतून आपल्या गावी निघून गेला होता.

२८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:१५ वाजता चमोलीच्या माना गावात हा अपघात झाला. मोली-बद्रीनाथ महामार्गावरील एका कंटेनर हाऊसमध्ये बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन चे कामगार राहत होते, तेव्हा बर्फाचा डोंगर घसरला. सर्व कामगार त्याखाली दाबले गेले.

सुटका करण्यात आलेल्या ४६ कामगारांना जोशीमठ येथील लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना ऋषिकेश एम्समध्ये रेफर करण्यात आले.

झेलेन्स्कींची खुर्ची धोक्यात

वॉशिंग्टन, दि. २ : युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की रशियाविरुद्धच्या युद्धात मदत मागण्यासाठी अमेरिकेत आले. येथे, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबतच्या भेटीदरम्यान, परिस्थिती इतकी बदलली की झेलेन्स्की यांना केवळ रिकाम्या हाताने परतावे लागले नाही तर अमेरिकेशी असलेले संबंधही बिघडले.

व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प आणि उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांच्यासोबत झेलेन्स्कींची चर्चा जागतिक राजकारणात मोठा बदल घडवून आणू शकते. युक्रेनमध्ये झेलेन्स्कींचे स्थान धोक्यात आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. झेलेन्स्कींवरील लोकांचा विश्वास कमी होत आहे, ज्यामुळे त्यांचे सरकार पाडणे सोपे होईल.

हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

खापरेश्वर मंदिराचे पुनर्निर्माण लवकरच : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २ : स्थानिक भाविक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या दिवसभराच्या जोरदार विरोधानंतरही खाप्रेश्वर, मूर्तीचे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्यापूर्वी विधीपूर्वक अंतिम पूजा संपन्न झाली. या प्रक्रिये दरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती कायम राहावी यासाठी पोलिस दलाचे अधिकारीही उपस्थित होते. पूजेच्या वेळी त्यांनी देखील सहभाग घेत भगवान खाप्रेश्वरांचे आशीर्वाद घेतले.

दिवसभरात झालेल्या आंदोलनांतून स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रहिवाशांनी आमदार रोहन खंवटे यांच्या अनुपस्थितीबद्दल नाराजी व्यक्त केली. पर्वरीचे आमदार यावेळी कुठे आहेत? आम्ही गेल्या २५ वर्षांपासून येथे वट पौर्णिमा साजरी करतो. सरकारच्या भूमिकेबाबत आम्हाला शंका आहे, परंतु आम्हाला हे मंदिर कायम हवे आहे, अशी भावना एका स्थानिक महिलेने व्यक्त केली.

एक रहिवासी फरीदा यांनी सांगितले, मी मुस्लिम असूनही मंदिर हटवले जात असल्याचे पाहून मला यातना होत आहेत. प्रशासनाने मंदिराला स्पर्श करण्याचा कोणताही अधिकृत आदेश नसताना असे पाऊल उचलले आहे.

या प्रकरणावरून विरोधी पक्षांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. आम आदमी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अमित पालेकर यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या आदेशात मंदिर हटवण्याचा कोणताही उल्लेख नव्हता. हा प्रशासनाचा मनमानी निर्णय आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनीही सरकारवर टीका करत विचारले, भगवान खाप्रेश्वर मंदिर हटवल्याने कोणाच्या भावना दुखावल्या जात नाहीत का?

संध्याकाळपर्यंत मंदिराच्या पुजाऱ्यांच्या देखरेखीखाली भगवान खाप्रेश्वर मूर्तीचे विधीवत स्थलांतर करण्यात आले. मंदिराची पुनर्बांधणी वटवृक्षाच्या नवीन जागेवर करण्यात येईल, असे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी स्पष्ट केले. देव श्री खाप्रेश्वर मंदिराचे नव्याने पुनर्बांधणी सरकारच्या वतीने करण्यात येईल, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.या संपूर्ण प्रकरणावरून नागरिकांमध्ये अस्वस्थता असून, प्रशासन आणि स्थानिकांमधील वाद अधिक चिघळण्याची शक्यता आहे.

नुवेमध्ये राष्ट्रीय महामार्ग ६६च्या विस्ताराला स्थानिकांचा विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २ : नुवेमधील रहिवाशांनी राष्ट्रीय महामार्ग ६६ च्या जुन्या भागाच्या प्रस्तावित विस्ताराला तीव्र विरोध दर्शविला असून, या प्रकल्पामुळे स्थानिक समुदायावर प्रतिकूल परिणाम होईल, अशी चिंता व्यक्त केली आहे. शनिवारी झालेल्या बैठकीत स्थानिक नागरिकांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. ही बैठक नुकतीच स्थानिक आमदार आणि मंत्री आलेक्स सिक्वेरा यांच्या विधानांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आली. सिक्वेरायांनी या महामार्गाच्या विस्तारासाठी प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले होते.

रहिवाशांच्या मते, सुमारे ५० मीटर अंतरावर नवीन महामार्ग कार्यान्वित झाल्याने वाहतूक त्याकडे वळली आहे. त्यामुळे जुन्या भागाचा विस्तार केल्याने वाहतूक सुरळीत होण्याऐवजी अपघातांची शक्यता वाढेल. विशेषतः परिसरातील शाळा आणि महाविद्यालयांत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियेतो फर्नांडिस यांच्यासह स्थानिक अधिकाऱ्यांनी यापूर्वी अनेक बैठका आणि स्थळ पाहणी केली आहे. त्यावेळीही रहिवाशांनी महामार्ग विस्ताराच्या निर्णयावर आक्षेप घेतला होता.

नुवेमधील सामाजिक कार्यकर्ते एव्हरसन व्हॅल्स यांनी यासंदर्भात भाष्य करताना सांगितले की, पश्चिम बायपास पूर्णतः कार्यरत असून जुन्या महामार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे जुन्या मार्गाचा विस्तार करण्याची आवश्यकता नाही.त्यांनी पुढे नमूद केले की, या परिसरात अनेक शैक्षणिक संस्था, उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये आहेत. अशा परिस्थितीत महामार्गाचा विस्तार झाल्यास विद्यार्थी आणि पालकांसाठी सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल. व्हॅल्स यांनी महामार्गाच्या रुंदीकरणामुळे वीजवाहिन्या, दूरसंचार केबल्स, तसेच सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणा बाधित होण्याची शक्यता व्यक्त केली. शिवाय, या विस्तारासाठी अनेक रहिवाशांच्या घरांसमोरील जागा घेतली जाऊ शकते, ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष आहे.

यापूर्वी झालेल्या वाहतूक विभागाच्या पाहणीत पश्चिम बायपास सुरू झाल्यापासून अपघातांचे प्रमाण घटल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे जुन्या महामार्गाचा विस्तार करण्याची गरज नसल्याचा रहिवाशांचा ठाम विश्वास आहे. पान २ ▶

मुंबई-गोवा रोपॅक्स फेरी सुरु होणार; जलवाहतुकीत क्रांती

मुंबई, दि. २ :



मुंबई ते गोवा प्रवास आता केवळ साडेसहा तासांत शक्य होणार आहे! लांबच लांब प्रवास आणि विमान प्रवासाच्या अडचणींना बाजूला सारत, एम२एम फेरीज ही कंपनी लवकरच मुंबई-गोवा रोपॅक्स फेरी सेवा सुरू करणार आहे. देशातील सर्वात लोकप्रिय मार्गांपैकी एक असलेल्या या प्रवासाला नव्या जलवाहतूक सुविधेमुळे अधिक वेगवान, सोयीस्कर आणि निसर्गरम्य अनुभव मिळणार आहे.

माझगाव फेरी डॉक , मुंबई येथून ही फेरी सुटेल आणि गोव्याच्या मुरगाव बंदरात दाखल होईल. शिवाय ही फेरी थेट पणजीपर्यंत आणता येईल का याची चाचपणी आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मंजूरीबाबत चर्चा सुरु असल्याची सुत्रांची माहिती आहे. या फेरीत एका वेळी ६२० प्रवासी राहू शकतील . तसेच ६० कार देखील या फेरीत राहू शकतील. मुंबई ते गोवा हा प्रवासाचा कालावधी सुमारे ६.५ तास असेल.

एम२एम फेरीजने इटलीहून १५ वर्षे जुनी रोपॅक्स जहाज विकत घेतले आहे, जे सध्या मुंबईत देखभालीसाठी आहे. मंजुरी मिळाल्यानंतर ही फेरी प्रवासी आणि वाहने दोन्हींसाठी खुली होईल, ज्यामुळे मुंबई-गोवा प्रवास अधिक जलद आणि आरामदायी होईल.

मनी कंट्रोलच्या रिपोर्टनुसार , ही फेरी भारताच्या विस्तारत असलेल्या जलवाहतूक नेटवर्कचा भाग असेल. यापूर्वी गुजरातमधील हाजिरा-घोघा फेरी सेवा यशस्वी ठरली आहे. महाराष्ट्र सरकारदेखील काशीद, रेवदंडा आणि दिघी येथे नवीन जेट्टी विकसित करत आहे, ज्या पुढील १८ महिन्यांत कार्यान्वित होतील. फेरीच्या तिकिट दरांविषयी अद्याप अधिकृत माहिती जाहीर झालेली नाही. मात्र, प्रवास अधिक किफायतशीर करण्यासाठी एम२एम फेरीज सरकारकडून इंधन अनुदान व करसवलती मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे.

हे फेरी यशस्वीरित्या सुरू झाल्यास रस्त्याने १२-१४ तास लागणारा प्रवास केवळ ६.५ तासांत पूर्ण होईल. तसेच महामार्गावरील वाहतुकीच्या गोंधळाऐवजी अथांग सागराचे मनमोहक दृश्य अनुभवता येईल. शिवाय गोव्यात वाहन भाड्याने घेण्याची गरज भासणार नाही . स्वतःचे कार किंवा बाईक फेरीत टाकून नेता येईल. रस्त्यावरील गर्दी आणि इंधनाचा वापर कमी होईल. एम२एम फेरीजने शिपिंग महासंचालक आणि अन्य अधिकृत यंत्रणांकडे मंजुरीसाठी अर्ज केला आहे. अंतिम मंजुरी मिळाल्यानंतरच ही सेवा सुरू होईल. मात्र, या सेवेमुळे मुंबई-गोवा प्रवास अधिक वेगवान, सोयीस्कर आणि पर्यावरणपूरक होणार, हे निश्चित आहे.

भंडारा नदीपात्राला तडा गेल्यापासून शेतकऱ्यांना मोठे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २ : काल रात्री भंडारा नदीच्या पात्राला तडा गेल्यामुळे फोंडा तालुक्यातील मडकई येथील शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आहे. नदीचे पाणी शेतात शिरल्याने शेतकऱ्यांच्या खाजनाच्या शेतात खारे पाणी आल्याने मिरची, तांबडी बाजी, कांदा, आणि इतर भाजीपाला पिकांचे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, बार आमरे खाजन शेतातील भंडारा नदी काठी जुना आणि कमकुवत झाला आहे. यामुळे नदीचे पाणी शेतात शिरणे त्यांना अधिक समस्या निर्माण करत आहे. कुंभारजुवे कालवा मडकई आणि कुठ्ठाळी दिशेने वाहत असून ते झुआरी नदीत विलीन होते.

तथापि, शेतकऱ्यांचा याबाबतचा दावा आहे की भंडारा शतकानुशतके जुना असलेल्या कालव्याच्या धरणाचे संरक्षण अद्याप होत नाही. यामुळे पिकांचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे. याआधीही भंडारा नदीच्या तड्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाला नवीन भंडारा बांधण्याची आणि या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.